‘युव्हीएसएल’साठी सुधारित आराखडा

■ वाढवण बंदर आणि वडोदरा-मुंबई द्रुतगती मार्गाशी जोडणार
■ प्रकल्प खर्च ८७,४२७ कोटींवरून ५२,६५२ कोटींवर

मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी

''मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ने उत्तन-विरार सागरी मार्ग अर्थात 'युव्हीएसएल'चा सुधारित आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला. प्रस्तावित उत्तन-विरार मार्ग वाढवण बंदर व समृद्धी महामार्गाला जोडण्यात येईल. त्यामुळे हा सागरी मार्ग प्रकल्प मुंबईला महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाशी जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे,'' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विशेष उद्देश वहन (एसपीव्ही) तयार करावे. प्रस्तावित मार्गाला आवश्यक मंजुरीची प्रक्रिया वेगाने करावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. प्रस्तावित उत्तन-विरार सागरी मार्ग प्रकल्पाचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळ कक्षात झालेल्या बैठकीत आढावा घेतला.

मार्ग अधिक जलद : मुख्यमंत्री फडणवीस

''उत्तन-विरार सागरी मार्ग हा प्रकल्पाच्या विरार कनेक्टरमार्फत हा सेतू वडोदरा-मुंबई एक्स्प्रेसवेशी थेट जोडला जाणार आहे, ज्यामुळे उत्तर उपनगरांपासून पश्चिम किनारपट्टीपर्यंतची वाहतूक मार्ग अधिक जलद व कार्यक्षम होणार आहे. हा प्रकल्प केवळ आर्थिक संधीच निर्माण करणार नाही, तर भारताच्या बंदर आधारित विकास दृष्टिकोनाला महत्त्वाची साथ देणारा ठरणार आहे,'' असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबईचे आयुक्त गगराणी, डॉ. संजय मुखर्जी, अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

महानगर आयुक्त मुखर्जी यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, डॉ. श्रीकर परदेशी, असिमकुमार गुप्ता, मिलिंद म्हैसकर, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक रामराव यांसह मिरा-भाईंदरचे आयुक्त, वसई-विरारचे आयुक्त उपस्थित होते.

किफायतशीर पर्यायावर सहमती

सविस्तर तांत्रिक व अभियांत्रिकी मूल्यांकनकेल्यानंतर 'एमएमआरडीए'ने ८७ हजार, ४२७ कोटी रुपयांपासून ते ५२ हजार, ६५२ कोटींच्या खर्चाचे प्रस्ताव असलेल्या सहा वेगवेगळ्या पर्यायांचे सादरीकरण केले. त्यातून आर्थिकदृष्ट्या अधिक कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक असलेल्या ५२ हजार, ६५२ कोटींच्या पर्यायाची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी निवड केली.

...असा आहे प्रकल्प

■ एकूण लांबी : ५५.१२ किमी
■ मुख्य सागरी मार्ग : २४.३५ किमी
■ कनेक्टर्स : ३०.७७ किमी
■ उत्तन कनेक्टर (९.३२ किमी) - बृहन्मुंबई महापालिकेच्या दहिसर-भाईंदर लिंक रोडशी जोड
■ वसई कनेक्टर (२.५ किमी) - पूर्णपणे उन्नत
■ विरार कनेक्टर (१८.९५ किमी) - वडोदरा-मुंबई एक्सप्रेसवेला जोडणारा
■ सद्यस्थितीत मुख्य सागरी मार्गासाठी ३+३ लेन कॉन्फिगरेशन
■ कनेक्टर्ससाठी २+२ लेन कॉन्फिगरेशन (१८.५५ मीटर रुंद)

३५ गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण

कल्याण, दि. २६ : प्रतिनिधी

महाराष्ट्र गो-सेवा आयोगाकडे नोंदणीकरिता अर्ज केलेल्या गोशाळांना अधिकृत नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण नुकतेच ठाणे जिल्हा परिषदेच्या सभागृहात करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे, अजिंक्य पवार, डॉ. वल्लभ जोशी, डॉ. कीर्ती डोईजोडे तसेच तालुकास्तरीय पशुवैद्यकीय अधिकारी, गोशाळा व्यवस्थापक व प्रतिनिधी उपस्थित होते.

> सामाजिक सहभागातून राबविण्यात येणाऱ्या पशुसंवर्धन उपक्रमांना जि. प. ठाणे नेहमीच सहकार्य करत आली आहे. पशुधनाच्या आरोग्य संवर्धनाबरोबरच गोशाळांनी विविध उत्पादनांची निर्मिती करून स्वयंपूर्णता व उत्पन्नवाढ साधावी, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल.
> **- रोहन घुगे,** मुख्य कार्यकारी अधिकारी

यावेळी डॉ. प्रशांत कांबळे यांनी सांगितले की, ''गोशाळांनी केवळ जनावरांचे पालनच नव्हे, तर स्वावलंबी व्हावे यासाठी प्रयत्न करावेत.'' तर अजिंक्य पवार यांनी सांगितले की, ''गोशाळांनी गोमूत्र, बायोगॅस, नैसर्गिक खत तयार करून स्थानिक बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पुढाकार घ्यावा. यामुळे केवळ गोशाळांचा आर्थिक स्तर उंचावणार नाही, तर समाजात त्यांचा सकारात्मक प्रभावही वाढेल.'' यावेळी इतर गोशाळांनीही अशाच उपक्रमांतून पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. अक्षदा गायकवाड यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. दर्शन दळवी यांनी आभार व्यक्त केले.

थोडक्यात

वसई येथे श्री गुरूमाईंचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

खानिवडे : वसई भिवंडीच्या तानसा खोऱ्यातील परिसरात वैद्यकीय, सामाजिक, शेती, पर्यावरण आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रसाद चिकित्सा या स्वयंसेवी संस्थेत, गणेशपुरी येथील परमपूज्य श्री गुरुमाई यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २४ जून रोजी विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सामान्य वैद्यकीय तपासणी व उपचार, मानसोपचार तपासणी उपचार व समुपदेशन, दंतचिकित्सा तपासणी व उपचार, नेत्रतपासणी व उपचार व औषधवाटप या मोफत आरोग्य शिबिरातून सुमारे ३०० गरीब, गरजू व दूरवरून आलेल्या रुग्णांनी लाभ घेतला. याचबरोबर 'प्रसाद चिकित्सा' संस्थेच्या अंगणवाडी पोषण कार्यक्रमांतर्गत १९ अंगणवाड्यांतील सुमारे ४५० बालकांना विशेष गोड पदार्थ, दूध आणि आरोग्यदायी नाश्ता वाटप करण्यात आला. शेती प्रकल्पांतर्गत गोराड फार्म येथे एकूण ५६ शेतकऱ्यांना सुमारे ५ हजार, ३४४ विविध फळझाडांच्या कलमांची रोपे देण्यात आली असून यंदा एक लाख रोपांचे वाटप व संवर्धनाचा संस्थेचा मानस आहे.

उचाट येथे कैलास पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात



वाडा : वाडा तालुक्यातील 'उचाट शिक्षण संस्थे'च्या अस्पी विद्यालय व ना. आ. शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक कैलास पाटील (उच्च माध्यमिक) यांचा सेवापूर्तीचा सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. कैलास पाटील यांनी २६ वर्षे समर्पित भावनेने सेवा बजावली. ते अनेक वर्षांपासून रोज न चुकता एका टेकडीवर जाऊन निसर्गसान्निध्यात योगासने करतात. म्हणून त्यांचा सेवापूर्ती कार्यक्रम योगदिनाचे औचित्य साधून करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत भोईर यांनी पाटील यांच्या ''दैनंदिन योगसाधनेमुळे निवृत्त होतानाही त्यांच्यामध्ये प्रचंड शारीरिक ऊर्जा असल्याचे आणि स्वभाव संयमी आहेत,'' असे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ए. एम. भोईर यांनी, तर निवेदन एन. जे. पाटील यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर मोरे, रवींद्र मोरे, दीपक मोरे आदी उपस्थित होते.

पायाभूत सुविधा प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करा : मुख्यमंत्री

बोरिवली ते ठाणे दुहेरी बोगदा प्रकल्पाचा घेतला आढावा

मुंबई, दि. २६ : विशेष प्रतिनिधी

राज्यात यापुढे कुठलाही पायाभूत सोयीसुविधेचा प्रकल्प रखडणार याची दक्षता घेत पुढील तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करून दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ सालापर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी विधान भवनातील कॅबिनेट सभागृहात घेतला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''दुहेरी बोगदा हा ११.८४ किमी लांबीचा असणार आहे. त्यामुळे बोगद्यात हवा खेळती राहिली पाहिजे. त्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी. प्रकल्पाच्या निर्मितीसाठी वन विभागाची दुसऱ्या टप्प्यातील परवानगी, रात्रीला काम करण्याची परवानगी घेण्यात यावी. बोरिवली बाजूकडील काम गतीने पुढे जाण्यासाठी आणि या बाजूकडील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून एक महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी.''

प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन

यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रकल्पग्रस्तांना भाडे देऊन अथवा अन्य गृहनिर्माण प्रकल्पात पुनर्वसनासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. सबंधित अधिकाऱ्याने एक महिना कारवाई करीत पुनर्वसन पूर्ण करावे. बोरिवली बाजूकडील अदानी, टाटा पॉवर प्रकल्पातील आवश्यक असलेल्या जमिनीचे संपादन करावे. तसेच, भूमिगत वीजवाहिन्या टाकण्यासाठी अदानी पॉवर कंपनीला रस्त्याची अंतिम नियोजन द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

उल्हासनगर पालिकेत आणीबाणीविषयक चित्रफितीचे प्रक्षेपण

उल्हासनगर, दि. २६ : प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा असलेल्या सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीला बुधवार, दि. २५ जून रोजी ५० वर्षे पूर्ण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या निर्देशानुसार उल्हासनगर महापालिका मुख्यालयात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आणीबाणीविषयक माहितीपट (चित्रफीत) दाखविण्यात आली.

महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपआयुक्त स्नेहा करपे, सहा. आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांच्या उपस्थितीत दुपारी ४ वाजता महापालिका सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या चित्रफितीत दि. २५ जून १९७५ ते दि. ३१ मार्च १९७७ या कालावधीत लागू करण्यात आलेल्या आणीबाणीदरम्यान देशभरात लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या सत्याग्रहींनी आपले अनुभव व विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास सहा. आयुक्त सलोनी निमकर, 'दिव्यांग कल्याण योजना' प्रमुख राजेश घनघाव, पर्यावरण विभाग प्रमुख दत्तात्रेय जाधव, वाहन विभाग प्रमुख विनोद केणे यांच्यासह अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सहा. आयुक्त (१) तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी उपस्थितांना ही माहितीपट महापालिकेच्या अधिकृत माध्यमांद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

'त्या' २५९ कामगारांना आम्ही न्याय देणार

■ कामगारमंत्र्यांचे 'मिरॅकल'च्या कामगारांना आश्वासन
■ माजी आ. नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने बैठक

कल्याण, दि. २६ : प्रतिनिधी

''अंबरनाथच्या मिरॅकल कंपनीतील त्या २५९ अन्यायग्रस्त कामगारांना आम्ही नक्कीच न्याय देऊ,'' असे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी बुधवार दि. २५ रोजी दिले. भाजपचे माजी आमदार आणि 'महाराष्ट्र परिश्रम कामगार संघटने'चे अध्यक्ष नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने मुंबईत ही बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये कामगारमंत्री फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारावर ताशेरे ओढत या बैठकीबाबत पूर्वसूचना देऊनही कंपनी मालक त्याला अनुपस्थित राहिल्याबद्दल संताप व्यक्त केला.

अंबरनाथमधील 'मिरॅकल केबल कंपनी'ने बेकायदेशीरपणे काढून टाकलेल्या २५९ कामगारांना पुन्हा कामावर घेण्याच्या मागणीसाठी 'महाराष्ट्र परिश्रम संघ' या कामगार संघटनेतर्फे गेल्या काही महिन्यांपासून कायदेशीर लढा सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून कामगार मंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला भाजप प्रदेश महामंत्री आ. विक्रांत पाटील, महाराष्ट्र परिश्रम संघ सचिव दिलीप कुमार मुंढे हेदेखील उपस्थित होते.



यावेळी कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीला चांगलेच फैलावर घेतले. ''बैठकीची माहिती असूनही मालक याठिकाणी उपस्थित का राहिले नाहीत?'' असा संतप्त सवाल केला. ''पुढच्या बैठकीला कंपनी मालक उपस्थित राहिले पाहिजेत. ते आले नाहीत, तर आम्हाला कायदेशीर मार्गाने हिसका दाखवावा लागेल,'' अशी तंबीही कामगारमंत्री फुंडकर यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीला दिली. तसेच या अन्यायग्रस्त कामगारांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांना नक्कीच न्याय मिळवून देण्यात येईल, असे आश्वासन यावेळी कामगार राज्यमंत्री आकाश फुंडकर यांनी दिले असल्याची माहिती माजी आ. पवार यांनी दिली.

कामगारांची अन्यायकारक पिळवणूक

''अंबरनाथच्या या 'मिरॅकल केबल कंपनी' व्यवस्थापनाने गार्डनिंग, पॅकेजिंग आणि हाऊस क्लिनिंगच्या नावाखाली २५० हून अधिक कामगारांची भरती केली आणि या कामगारांकडून कंपनीतील मुख्य स्वरूपाचे काम करून घेतले जात होते. तसेच किमान वेतन, आरोग्य विमा, भविष्य निर्वाह निधी असे कामगार कायद्यातील कोणतेही फायदे या कर्मचाऱ्यांना दिले जात नव्हते. एकप्रकारे या कंपनी व्यवस्थापनाकडून या कामगारांची अन्यायकारक पिळवणूक केली जात असल्याचे माजी आ. पवार यांनी कामगारमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, कंपनी व्यवस्थापनाची ही चोरी पकडली गेल्यानंतर या २५९ कामगारांना अन्यायकारक पद्धतीने तडकाफडकी कामावरून काढून टाकण्यात आले असून त्याविरोधात गेल्या तीन महिन्यांपासून लढा सुरू आहे,'' असे पवार यांनी यावेळी सांगितले.

Nuvoco Vistas Corp. Ltd.

सीआयएन : L26940MH1999PLC118229
नोंदणीकृत कार्यालय: इक्विनॉक्स बिझनेस पार्क, टॉवर ३, पूर्व विंग, ४ था मजला, ला.ब.शा. मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७०
दूरध्वनी: +९१ (०) २२-६७६९२५०० | ईमेल: investor.relations@nuvoco.com वेबसाईट: www.nuvoco.com

२६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **नुव्होको व्हिस्टाज कॉर्पोरेशन लिमिटेड** ("कंपनी") च्या सदस्यांची **२६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** ("एजीएम") (आयपीओनंतरची ४ थी) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे पारित दिनांक ५ मे, २०२०, ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर, २०२१, ५ मे, २०२२, २८ डिसेंबर, २०२२, २५ सप्टेंबर, २०२३ आणि १९ सप्टेंबर, २०२४ रोजीची परिपत्रके ("एमसीए परिपत्रके") आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाद्वारे पारित दिनांक १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२ ५ जानेवारी, २०२३, ७ ऑक्टोबर, २०२३ आणि ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीची परिपत्रके ("सेबी परिपत्रके") यांच्यासह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ आणि सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ ("सूचिबद्धता विनियमन") च्या अनुपालनामध्ये कंपनीच्या सदस्यांना वितरित करण्यात येणाऱ्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे कामकाज करण्याकरिता **शुक्रवार, २५ जुलै, २०२५ रोजी दु. ३.३० (भाप्रवे) वाजता** व्हिडियो कॉन्फरान्सिंग ("व्हीसी") / इतर दृक श्राव्य माध्यमे ("ओएव्हीएम") द्वारे घेण्यात येणार आहे.

एमसीए आणि सेबी परिपत्रकांनुसार, वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता कंपनीच्या एकत्रीकृत वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट ("आरटीए")/डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट(स) ("डीपीज") कडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येतील. सूचिबद्धता विनियमनांच्या विनियमन ३६(१)(बी) च्या अनुषंगाने, ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी केलेले नाहीत त्यांना वि.व. २०२४-२५ करिता एकत्रिकृत वार्षिक अहवाल प्राप्त करण्याकरिता वेब-लिंक आणि क्यूआर कोड देणारे पत्र पाठविण्यात येईल. त्याची भौतिक प्रत, जे सदस्य investor.relations@nuvoco.com येथे त्यांचे नाव, फोलियो क्रमांक / डीपी आयडी आणि क्लायन्ट आयडी नमूद करून त्याकरिता विनंती पाठवतील त्यांना कंपनीद्वारे पाठविण्यात येईल. हरित उपक्रमाला पाठिंबा देण्याकरिता, सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे नोंदवावे/ अद्ययावत करावे.

सदस्य फक्त व्हीसी/ओएव्हीएमद्वारेच एजीएमला उपस्थित आणि सहभागी होऊ शकतील. कंपनी त्यांच्या सदस्यांना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावा(वां)वर त्यांचे मत दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदान (एजीएमपूर्वी आणि दरम्यान) समाविष्ट असलेल्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देण्याकरिता सुविधा प्रदान करणार आहे. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सहभागासंबंधी तपशीलवार सूचना आणि मतदानाची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता कंपनीच्या एकत्रीकृत वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.nuvoco.com/annual-reports, स्टॉक एक्सचेंज म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईट अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे देखील उपलब्ध असतील.

नुव्होको व्हिस्टाज कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
सही/-
श्रुता संघवी
एसव्हीपी आणि कंपनी सचिव

दिनांक : २६ जून, २०२५
ठिकाणः मुंबई

Choose from our range of 60+ products in: Cement | Ready-Mix Concrete | Modern Building Materials
CONCRETO DURAGUARD DOUBLE BULL ZERO M Artiste InstaMix Ecodure

विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

सीआयएन: एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
नोंदणीकृत कार्यालय: रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. **दूरध्वनी:** २२८२ २७०८/६९८२९०००
ई-मेल: cs.vinylchemicals@pidilite.com **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, लाभांश, रेकॉर्ड तारिख आणि ई-मतदान यासंदर्भात माहिती

वार्षिक सर्वसाधारण सभा:

समभागधारकांनी नोंद घ्यावी की, कंपनीची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **बुधवार, ३० जुलै २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/ अन्य दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम)** सुविधेच्या माध्यमातून, कंपनी कायदा २०१३ (द 'ॲक्ट') आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम तसेच सिक्युरिटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ यांना अनुसरून, इतर परिपत्रके तसेच एकत्रित वाचनासह कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए'') जारी केलेले सामान्य परिपत्रक क्रमांक २०/२०२०, दिनांक ५ मे, २०२०, ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३, ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४, आणि मास्टर परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/PoD2/CIR/P/2023/120 दिनांक ११ जुलै २०२३, परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/167 दिनांक ७ ऑक्टोबर २०२३, परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2024/133 दिनांक ३ ऑक्टोबर २०२४, तसेच या संदर्भात आणि वेळोवेळी जारी केलेल्या इतर संबंधित परिपत्रकांसह, सूचनेत नमूद केल्याप्रमाणे उक्त वार्षिक सर्वसाधारण सभेला (''एजीएम नोटीस'') आयोजनाच्या नोटीसमध्ये नमूद केलेले कामकाज पूर्ण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त परिपत्रकांचे पालन करून, आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या कंपनी वार्षिक अहवालाच्या लिंकसह एजीएम नोटीसच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, ज्या सभासदांनी आपले ई-मेल आयडी कंपनी/ रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण (आर ॲण्ड टी) प्रतिनिधी/डिपॉझिटरी पार्टिसीपंटस् ('डीपी') यांच्याकडे नोंदविलेले आहेत, अशा सर्व सभासदांना कंपनी पाठवणार आहे. वर नमूद केलेल्या एमसीए आणि सेबी परिपत्रकांनुसार वार्षिक अहवालाच्या छापील प्रती पाठविण्याची आवश्यकता पूर्ण करण्यात येईल. तथापि, आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी एजीएम सूचना व वार्षिक अहवालाच्या मुद्रित प्रती त्या सदस्यांना पाठवण्यात येतील, जे सदस्य आरटीए च्या वेबसाईटवरून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सेवा विनंती करतील, त्यासाठी खालील लिंक वापरा: https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html.

एजीएम नोटीससह आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com तसेच कंपनीचे समभाग सूचीबध्द असलेल्या शेअरबाजारांची संकेतस्थळे म्हणजेच बीएसई लिमिटेड (बीएसई) चे www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) चे www.nseindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेडचे (एनएसडीएल) संकेतस्थळ www.evoting.nsdl.com यावरसुध्दा उपलब्ध करुन दिला जाईल.

मतदानाविषयी माहिती:

एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर त्यांचे मत देता यावे, याकरिता समभागधारकांना दूरस्थ ई-मतदान सुविधा (रिमोट ई-व्होटिंग) प्रदान करण्यात आलेली आहे.

समभागधारकांना एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदान सुविधेचा वापर करून किंवा एजीएम दरम्यान ई-मतदानाचा वापर करत मतदान करण्याचा पर्याय आहे.

(अ) एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदान, (ब) एजीएमच्या दिवशी ई-मतदान आणि (क) व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहणे यासंबंधीच्या तपशीलवार सूचना एजीएम नोटीसमध्ये नमूद केलेल्या आहेत.

समभागधारकांना याबाबत काही शंका असल्यास, ते एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेले फ्रिक्वेन्टली आस्कड् क्वेश्चन्स (एफएक्यूज) फॉर शेअरहोल्डर्स आणि ई-व्होटींग युझर मॅन्युअल फॉर शेअरहोल्डर्स याचा संदर्भ घेऊ शकतात अथवा ०२२ ४८८६ ७००० या क्रमांकावर कॉल करावा अथवा आपली विनंती श्री. अमित विशाल, उपाध्यक्ष, एनएसडीएल यांना evoting@nsdl.com या ई-मेलच्या माध्यमातून पाठवू शकतात.

ई-मेल पत्यांची नोंदणी करणे:

छापील स्वरुपात समभाग धारण केलेले सभासद आणि ज्यांनी कंपनीसोबत आपले ईमेल पत्ते अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी आरटीएच्या वेबसाईटद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सेवा विनंत्या दाखल करणे, ज्याची लिंक https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html अथवा कंपनीच्या cs.vinylchemicals@pidilite.com वर ई-मेल पाठवून त्यांचे ई-मेल पत्ते अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

डिमटेरिअलाइज्ड स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांना त्यांच्या संबंधित डीपीकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणी/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते.

लाभांशाचे वितरण आणि रेकॉर्ड तारिख:

समभागधारकांनी याची नोंद घ्यावी की, आगामी एजीएममध्ये समभागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहत, कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या ५ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी १/- रुपये दर्शनी मूल्याच्या समभागासाठी, प्रति समभाग ७/- रुपये एकूण लाभांशाची शिफारस केलेली आहे. लाभांश, जर समभागधारकांनी मंजूर केला तर, ज्या समभागधारकांची नावे रेकॉर्ड तारखेनुसार, म्हणजेच, **मंगळवार, १५ जुलै २०२५** पर्यंत परिस्थितीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद झालेली असतील, अशा समभागधारकांना सोमवार ४ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा नंतर दिला जाईल.

ज्या समभागधारकांनी त्यांचे बँक खाते तपशील अद्ययावत केलेले आहेत, त्यांना लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने विविध ऑनलाइन हस्तांतरण पद्धतींद्वारे दिला जाईल.

जे शेअरहोल्डर्स भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करत आहेत त्यांनी हे लक्षात घ्यावे की सेबी ने १६ मार्च २०२३ च्या परिपत्रकाद्वारे (सेबी मास्टर परिपत्रक क्रमांक SEBI/HO/MIRSD/POD-1/P/CIR/2024/37 दिनांक ७ मे २०२४ चा भाग म्हणून समाविष्ट) अनिवार्य केले आहे विनंती आहे की १ एप्रिल, २०२४ रोजी लाभांश केवळ त्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दिला जाईल ज्यांचे फोलिओ केवायसी अनुपालन आहेत. म्हणून, भौतिक स्वरूपात समभाग धारण केलेल्या भागधारकांना त्यांचे केवायसी तपशील अद्यतनित करण्याची विनंती केली जाते उदा. कंपनीने घोषित केलेल्या लाभांशाची पावती सुनिश्चित करण्यासाठी **१५ जुलै २०२५** रोजी किंवा त्यापूर्वी कंपनी/आर आणि टी एजंट्सकडे पॅन, बँक तपशील आणि नामांकन तपशील.

कायद्याच्या कलम ९१ ला अनुसरून तसेच कंपनीज (मॅनेजमेंट अँण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम १० आणि लिस्टींग रेग्युलेशन्सची नियमावली ४२ यांच्या एकत्रित वाचनासह नोटीस देखील दिली जात आहे की, एजीएमसाठी त्याचबरोबर एजीएमच्या ठिकाणी सभासदांनी मंजुरी दिल्यास लाभांशाच्या वितरणासासाठी कंपनीने **मंगळवार, दिनांक १५ जुलै २०२५** ही रेकॉर्ड तारिख निश्चित केली आहे.

सभासद याबाबत अवगत आहेत की, वित्तीय कायदा २०२० द्वारे सुधारित करण्यात आलेल्या प्राप्तीकर कायदा १९६१ (आयटी ॲक्ट), नुसार, १ एप्रिल २०२० नंतर कंपनीने दिलेला किंवा वितरित केलेला लाभांश सभासदांना मिळताना करपात्र असेल आणि कंपनीला सदर लाभांशातून विहित दराने उदगम कर (टीडीएस) कपात करणे आवश्यक आहे. सभासदांच्या निवासी स्थितीनुसार आणि त्यांनी वेळेत सादर केलेल्या आणि कंपनीने स्वीकारलेल्या कागदपत्रांनुसार टीडीएसचे दर बदलू शकतात.

कंपनीने यासंदर्भात, कंपनी/आर अँण्ड टी प्रतिनिधी/डिपॉझिटरीजकडे आपल्या ई-मेलची नोंदणी केलेल्या सर्व सभासदांना १८ जून २०२५ रोजी पाठविलेल्या ईमेल संप्रेषणाद्वारे समभागधारकांना दिलेल्या लाभांशावर विहीत दरान कपात केल्या जाणाऱ्या कराची आकारणी रोखण्याची प्रक्रिया आवश्यक परिशिष्टांसह स्पष्ट केलेली आहे. हे संप्रेषण कंपनीच्या www.vinylchemicals.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

ईमेलची नोंदणी आणि बँक खाते तपशील अद्ययावत करणे:

जे समभागधारक त्यांच्या ईमेल पत्त्याची नोंदणी करू इच्छितात आणि/किंवा लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचा तपशील अद्ययावत करू इच्छितात त्यांना खालील सूचनांचे पालन करण्याची विनंती केली जात आहे:

अ) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेल्या समभागांसाठी: डीपीने सुचविलेल्या प्रक्रियेनुसार तुमच्या डीमॅट खात्यात तपशीलांची नोंदणी करा/ अद्ययावत करा.

ब) छापील स्वरूपात असलेल्या समभागांसाठी: कंपनीचे आर अॅण्ड टी प्रतिनिधी, एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे विहित फॉर्म आयएसआर-१ मध्ये तपशीलांची नोंदणी करा/अद्ययावत करा. सेबीच्या १६ मार्च २०२३ चे (सेबी मास्टर परिपत्रक क्रमांक SEBI/HO/MIRSD/POD-1/P/CIR/2024/37 दिनांक ७ मे २०२४ चा भाग म्हणून समाविष्ट) परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी-१/पी/सीआयआर/२०२३/३७ ला अनुसरून कंपनीने छापील स्वरूपात समभाग धारण केलेल्या समभागधारकांना आणि त्यांच्या संबंधित फोलिओमध्ये नोंदणीकृत नसलेला केवायसी तपशील सादर करण्यासाठी त्यांना पत्रे पाठवलेली आहेत.

तसेच, कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com यावर उपलब्ध असलेल्या संबंधित फॉर्मचा देखील समभागधारक वापर करू शकतात.

उपरोक्त माहिती कंपनीच्या समभागधारकांच्या माहितीसाठी आणि फायद्यांसाठी जारी केली जात आहे आणि ती यासंदर्भात लागू असलेली एमसीए आणि सेबी परिपत्रक (के) यांचे पालन करते.

कोणतीही शंका असल्यास, समभागधारक कंपनीचे आर अॅण्ड टी प्रतिनिधी येथे संपर्क साधू शकतात.

एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीचे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड),
युनिट: विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड
सी १०१, पहिला मजला, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३,
दूरध्वनी : +९१ ८१०८११८४८४, वेबसाईट: https://www.in.mpms.mufg.com

विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडसाठी
सही/-
आरती फलोर
कंपनी सचिव
एफसीएस ८७२६

स्थळ : मुंबई
दिनांक : २६ जून, २०२५